महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४

क्रमाक कोविमं/ १२वी परीक्षा/ 482
दिनांक :- ३१/०५/२०१९

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा/सांगली/कोल्हापूर

विषय : जुलै-ऑगस्ट २०१९ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखांबाबत

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, जुलै-ऑगस्ट २०१९ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची नियमीत,पुनर्परिक्षार्थी,नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणा-या विद्यर्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahahsscboard.in** या संकेत स्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखां खालीलप्रमाणे -

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयानी बँकेत चलनाव्दारे शुल्क भरावयाच्या तारखा | **उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी वितरण केंद्राकडे** शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | सोमवार ,दिनांक ०३ जून,२०१९ ते शुक्रवार दिनांक १४ जून, २०१९ | गुरूवार दिनांक २० जून २०१९ ते सोमवार दिनांक २४ जून,२०१९ | बुधवार दिनांक २६ जून,२०१९ |
| विलंब शुल्क | शनिवार दिनांक १५ जून,२०१९ ते बुधवार दिनांक १९ जून,२०१९ | | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्याच उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. श्रेणीसुधार करु इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्ट २०१९ व फेब्रु-मार्च २०२० अशा लगतच्या दोन संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.
२. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क बँक ऑफ इंडियात मंडळाच्या खात्यात जमा करुन बँक चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीत विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.
३. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना फेब्रु-मार्च २०१९ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.
४. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाव्दारेच भरण्यात यावे.
५. आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.
६. **वितरण केंद्र प्रमुखांनी प्राप्त झालेले शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या विभागीय मंडळामध्ये शुक्रवार दि.२८/०६/२०१९ रोजी समक्ष जमा कराव्यात.**

31/5

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर**

Rao general